# ॥ज्योतिर्मय॥

Online Journal of Literature....

साहित्याचे विद्यापीठ

❑ पुणे ❑ वर्ष १ ले ❑ अंक ७४ वा ❑ शुक्रवार दि.२५ एप्रिल २०२५ ❑ पाने ४ ❑ मूल्य : निशुल्क (खासगी वितरणासाठी)


विशेष लेख...

## पहलगाममधील हिंदू पर्यटकांना टार्गेट

– प्रा डॉ सुधीर अग्रवाल

**ज्योतिर्मय साहित्य**

पहलगाम हल्ल्याने दहशतवाद्यांच्या आणखी एका कृत्याचा पर्दाफाश केला, तो म्हणजे त्या व्यक्तीला मारण्यापूर्वी त्याचा धर्म शोधणे. प्रत्यक्षदर्शींनी सांगितले की, दहशतवाद्यांनी एका व्यक्तीचे हिंदू नाव ऐकताच, त्यांनी लगेच त्याच्यावर गोळीबार केला. या दहशतवादी घटनेत आतापर्यंत २८ पर्यटकांचा मृत्यू झाला आहे तर अनेक जण जखमी झाले आहेत. मुंबईतील २६/११ च्या हल्ल्यानंतर इतक्या मोठ्या संख्येने निष्पाप लोकांचा बळी गेलेला हा पहिलाच दहशतवादी हल्ला आहे. विशेष म्हणजे जखमी पर्यटकांकडून मिळालेल्या माहितीनुसार जिहादी दहशतवाद्यांनी हल्ला करण्यापूर्वी एक पर्यटक महिलेच्या हातातील बांगड्यांचा चुडा पाहून त्यांची नावे विचारली होती. त्यावरून पर्यटक कोणत्या धर्माचे आहेत याची माहिती घेऊनच त्यांनी हल्ला चढवला.याचाच अर्थ असा की आगामी काळात होणाऱ्या अमरनाथ यात्रेवर दहशतवादी हल्ला करू शकतात.

पहलगाममधील दहशतवादी हल्ला हा निश्चितच पूर्वनियोजित कट होता. पर्यटकांना खिंडीत पकडून, ते बेसावध असताना व त्यांच्या आजूबाजूला सुरक्षा व्यवस्था नसताना त्यांच्यावर हल्ला करण्यात आला. देशाच्या विविध भागांतून हजारो पर्यटक काश्मीर खोऱ्यात आनंद लुटायला गेलेले असताना हा दहशतवादी हल्ला झाला व त्या टोळीने मोठा रक्तपात घडवला. पर्यटकांमधे दहशत व भीती निर्माण व्हावी, त्यातून हिंदुस्थानातील पर्यटकांनी काश्मीरला फिरकू नये असे कारस्थान रचले गेले. मोदी सरकारच्या दुसऱ्या टर्ममधे पुलवामा येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतरचा हा पहलगामचा दुसरा मोठा दहशतवादी हल्ला आहे. पुलवामा येथे दहशतवाद्यांनी सुरक्षा दलाच्या वाहनांवर हल्ला करून ४० जवानांची हत्या केली होती, पहलगाम येथे २८ पर्यंटकांचे त्यांनी बळी घेतले. पहलगाम येथे निष्पाप पर्यटकांवर निर्दयी दहशतवादी हल्ला झाला. पर्यटक नि:शस्त्र होते, तर दहशतवद्यांकडे एके ४७ सारख्या अत्याधुनिक बंदुका होत्या. पर्यटक कुटुंबीयांसह मौजमजा करायला आले होते, ते प्रतिकार करू शकणार नाहीत हे दहशतवाद्यांनी पूर्ण ओळखले होते. म्हणूनच तेथे असलेल्या ४० पर्यटकांपैकी २८ जणांवर समोरून गोळ्या घालून त्यांनी हत्या केली. गोळ्या झाडण्यापूर्वी दहशतवाद्यांनी पर्यटकांना त्यांची नावे विचारली. ते हिंदू असल्याची खात्री करून घेतली व त्यांना जागीच ठार मारले. नावे सांगितल्यावर ज्यांच्याविषयी दहशतवाद्यांना संशय आला त्यांचे कपडे उतरवून, त्यांची शारीरिक तपासणी करून त्यांच्यावर बंदुका चालविल्या. काहींना तर कुराणातील कलाम पढायला दिले, ते वाचता आले नाही म्हणूनही ठार मारले. पर्यटक हिंदू आहेत हा एकच निकष या नरसंहारामागे होता. नवविवाहीत तरुणीच्या पतीला तिच्या समोरच दहशतवाद्यांनी ठार मारले, तेव्हा ती मलाही ठार मारा असे ओरडून सांगत होती, पण तिला त्यांनी मारले नाही, उलट जा, मोदींना जाऊन सांग, असे दरडावून बजावले. पर्यटकांना टिपून टिपून मारले हेच या हत्याकांडातून दिसून आले. १९९० च्या दशकात काश्मीर खोऱ्यात दहशतवाद जेव्हा शिगेला पोहोचला होता, तेव्हा हिंदूंना (पंडितांना) तेथे राहणे दहशतवाद्यांनी अशक्य केले होते. त्यांचे अपहरण, त्यांची हत्या, हिंदू महिलांवर बलात्कार, अत्याचार असे सर्वत्र प्रकार घडले. काश्मीर खोऱ्यात हिंदूंनी पुन्हा फिरकू नये, म्हणून दहशतवाद्यांनी पहलगाममधे हिंदूंचा नरसंहार घडवला असेल, तर भारत सरकारला दहशतवाद मोडून काढण्यासाठी कठोर पावले उचलावी लागतील.

धर्माच्या आधारावर होणारा हा गोळीबार पुन्हा एकदा जम्मू आणि काश्मीरच्या पुनर्संचयित वैभवाला मागे टाकेल. पर्यटकांच्या गर्दीमुळे जम्मू आणि काश्मीरमध्ये पुन्हा एकदा आशा निर्माण झाली होती की वसंत ऋतू पुन्हा खोऱ्यात परतेल. खोऱ्यातील हॉटेल व्यावसायिकांपासून ते लोकरीचे कापड आणि केशर उत्पादकांपर्यंत, सर्वजण आनंदाने ओतप्रोत होते. त्याच्या कौशल्याची त्याला योग्य किंमत मिळत होती.काश्मीरचे जनजीवन सुरळीत होत असतानाच काश्मीरला पुन्हा आर्थिक सुबत्ता प्राप्त होत आहे हे ज्यांना बघवत नाही, अशा नतद्रष्ट प्रवृत्तींनी पहलगाममधे दहशतवादी हल्ला घडवला. काश्मीरच्या अर्थव्यवस्थेला खीळ बसावी, खोऱ्यात पुन्हा अशांतता निर्माण व्हावी, भारताविषयी काश्मिरी जनतेच्या मनात द्वेष आणि संताप आहे, असा संदेश जगभरात जावा, यासाठी दहशतवाद्यांनी पहलगाममधे नरसंहार घडवला. दहशवादाला धर्म नसतो,असे म्हटले जात असले तरी पाकिस्तान पुरस्कृत दहशतवादाला धर्माची किनार आहे, हे पुन्हा एकदा स्पष्ट झाले आहे.

दहशतवादाला एखाद्या विशिष्ट धर्माशी जोडणे योग्य आहे का यावर बराच काळ वादविवाद सुरू आहे ? याला उत्तर म्हणून, लोक असे मानतात की असे करणे चुकीचे आहे आणि काही मोजकेच मार्ग गमावलेल्या लोकांमुळे संपूर्ण इस्लाम धर्माला दोष देणे हा या धर्माला कमी करण्याचा प्रयत्न आहे.परंतु पहलगाममधे झालेल्या नरसंहारा नंतर व या आधी झालेल्या आतंकवादी हल्ल्याने धर्माचा संबंध दहाशवादवाशी आहे..यावर मतैक्य होणे आवश्यक आहे

# छत्रपती शिवाजी महाराजांनी मराठी भाषेचा उपयोग केला, त्याचवेळेला मराठी भाषा अभिजात झालेली होती – मंत्री उदय सामंत

**ज्योतिर्मय साहित्य**

**रत्नागिरी** – विश्व मराठी साहित्य संमेलनात देण्यात येणाऱ्या साहित्यभूषण पुरस्काराची रक्कम यंदापासून १० लाख रुपये करण्यात येत आहे. तसेच मालगुंड येथील केशवसुतांच्या स्मारकाच्या नुतनीकरणासाठी १ कोटी रुपये दिले जातील, अशी घोषणा मराठी भाषा मंत्री डॉ. उदय सामंत यांनी आज करतानाच साहित्यिक नसतील तर सांस्कृतिक क्षेत्र पुढे जाऊ शकत नाही, असेही सांगितले.

महाराष्ट्र शासन मराठी भाषा विभाग व राज्य मराठी विकास संस्था आणि कोकण मराठी साहित्य परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने कवी केशवसुत स्मारक मालगुंड येथे पुस्तकांचे गाव लोकार्पण सोहळा आणि कोकण साहित्य सन्मान दालनाचे उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ साहित्यिक कोमसापचे संस्थापक पद्मश्री मधु मंगेश कर्णिक, ज्येष्ठ साहित्यिक नाटककार गंगाराम गवाणकर, कवी अरुण म्हात्रे, जिल्हाधिकारी एम देवेंदर सिंह, पोलीस अधीक्षक धनंजय कुलकर्णी, मराठी भाषा संचालक डॉ. शामकांत देवरे, उपजिल्हाधिकारी तथा मराठी भाषा अधिकारी शुभांगी साठे, सरपंच श्वेता खेऊर आदी उपस्थित होते.

पालकमंत्री डॉ. सामंत म्हणाले, मराठी भाषा विभाग हे खातं मी मागून घेतलं आहे. कोकणाला साहित्यिकांची फार मोठी परंपरा लाभलेली आहे. मराठी भाषेचा मंत्री झाल्यावर माझ्या हातून मंगेश पाडगावकरांच्या गावी कवितेचे दालन पुस्तकांचे गाव, कुसमाग्रजांच्या शिरवाडे गाव पुस्तकांचे गाव सुरु करण्याचे नियतीच्या मनात असावे. साहित्यिकांचा पुरस्कार सोहळा गेट वे ऑफ इंडिया येथे दोन दिवस घेतला. विश्व मराठी साहित्य संमेलन पुण्यात घेतले. पहिला साहित्य भूषण पुरस्कार पद्मश्री मधु मंगेश कर्णिक यांना देण्याचे भाग्य लाभले.

ज्ञानेश्वरांनी ज्यावेळी ज्ञानेश्वरी लिहिली त्याचवेळेला मराठी भाषा ही अभिजात आहे, हे सिध्द झालेले आहे. छत्रपती शिवाजी महाराजांनी मराठी भाषेचा उपयोग केला, त्याचवेळेला मराठी भाषा अभिजात झालेली होती, असे सांगून मंत्री उदय सामंत म्हणाले, मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा दिल्याबद्दल प्रधानमंत्री नरेंद मोदी यांचे मनापासून अभिनंदन करतो. कवी केशवसुत, कुसुमाग्रज, मंगेश पाडगावकर, मधु मंगेश कर्णिक यांचा आदराने उल्लेख लंडनमध्ये झाला होता. कोकणाने राज्याला दिलेले साहित्यिक पाहता कोकण साहित्याच्या दृष्टीने प्रगत आहे. हे साहित्य आपण सर्वांनी पोहचविले पाहिजे.

यापुढे बालसाहित्य संमेलन, युवा साहित्य संमेलन, महिला साहित्य संमेलन होईल. या प्रत्येक साहित्य संमेलनासाठी पाच पाच कोटींची तरतूद केलेली आहे, असे सांगून डॉ. सामंत म्हणाले, मराठी भाषेत ताकद आहे.




मराठी भाषा ताकदवान करण्याचे काम साहित्यिकांनी केले आहे. देशाच्या सांस्कृतिक विभागाचा पाया हा साहित्यिक आहे. जोपर्यंत साहित्यिक नाटक लिहीत नाही तोपर्यंत नाटक रंगमंचावर येत नाही.

अनेकांनी याचा अभ्यास केला पाहिजे. जे काही संगीत निर्माण होतं, गाणी निर्माण होतात, जे काही नाटके निर्माण होतात, जे काही चित्रपट निर्माण होतात, जर साहित्यिक नसतील तर सांस्कृतिक क्षेत्र पुढे जाऊ शकत नाही. याचा अर्थ आपल्या सगळ्या सांस्कृतिक परंपरेचा पाया हा आपल्या महाराष्ट्रातील साहित्यिक आहेत. कवी केशवसुत स्मारक हे माझ्या मतदार संघात आणि तुमच्या मालगुंड गावामध्ये आहे याचा आपल्या सर्वांना अभिमान असला पाहिजे आणि तो अभिमान आपण ठेवावा, असेही ते म्हणाले.

अध्यक्षीय भाषणात पद्मश्री श्री. कर्णिक म्हणाले, कवी केशवसुत मालगुंडला जन्माला आले हे महाराष्ट्राचे भाग्य आहे. एका हातात भाकरी असेल तर ती भाकरी आपल्याला जगवेल. दुसऱ्या हातात पुस्तक असेल तर का जगावं हे ते पुस्तक सांगेल. संचालक डॉ. देवरे यांनी पुस्तकांच्या गाव या मागील शासनाची भूमिका सांगितली. कोमसापच्या केंद्रीय अध्यक्ष नमिता कीर यांनीही आपले मनोगत व्यक्त केले. अरुण म्हात्रे यांनी शिपाई कविता सादर केली. विश्वस्त प्रमुख रमेश कीर यांनी स्वागत प्रास्तविक केले. आनंद शेलार यांनी आभार मानले. कार्यक्रमाची सुरुवात दीप प्रज्ज्वलनाने झाली. मालगुंड ग्रामपंचायतीत प्रथम पुस्तक दालनाचे उद्घाटन करण्यात आले.

कार्यक्रमास जयु भाटकर, कोमसापचे केंद्रीय कार्याध्यक्ष प्रा. प्रदीप ढवळ, कवी केशवसुत स्मारक व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष गजानन पाटील, सुनिल मयेकर, नलिनी खेर आदींसह साहित्यिक, ग्रामस्थ उपस्थित होते.

# पहलगाम दहशतवादी हल्ल्याचा सकल हिंदू समाजातर्फे निषेध

**ज्योतिर्मय साहित्य**

**पुणे** – जम्मू – काश्मीरमधील पहलगाम येथे पर्यटकांवर झालेल्या हल्ल्याचा सकल हिंदू समाजातर्फे तीव्र निषेध करण्यात आला. पिंपळे सौदागर येथील दत्त मंदिर परिसरात सायंकाळी झालेल्या कार्यक्रमात ‘‘एक है तो सेफ है‘‘, ‘‘बटेंगे तो कटेंगे‘‘, ‘‘हिंदू की रक्षा यह मेरी दिक्षा‘‘ ‘‘निष्पाप पर्यटकांची हत्या करणाऱ्या नपूसकांचा जाहिर निषेध‘‘ असा मजकूर असलेले फलक घेऊन आंदोलन करण्यात आले. दहशतवाद्यांनी केलेल्या हल्ल्यात मृत्युमुखी पडलेल्या पर्यटकांना यावेळी श्रद्धांजली अर्पण करण्यात आल. याप्रसंगी सकल हिंदू समाज, संस्कृती संवर्धन मंच, संत ज्ञानेश्वर ब्राह्मण सभा , राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे कार्यकर्ते तसेच पिंपरी चिंचवड भाजपाचे कार्यकारी अध्यक्ष शत्रूघ्न बापू काटे, मा. नगरसेविका निर्मलाताई




कुटे, संकेत कुटे, विलास जोशी, अभय वडनेरकर, रमेश वाणी, चारुहास शुक्ल, स्नेहा चिंचवडकर, अमीत वडनेरकर, श्रीनिवास पारखी आदी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# नाशिकचे जिल्हाधिकारी जलज शर्मा यांना पंतप्रधान नागरी सेवा उत्कृष्टता पुरस्कार २०२३ प्रदान

**ज्योतिर्मय साहित्य**



**नवी दिल्ली** – नागरी सेवा दिनानिमित्त नाशिकचे जिल्हाधिकारी जलज शर्मा यांना ‘पंतप्रधान नागरी सेवा सर्वोत्कृष्टता पुरस्कार २०२३’ प्रदान करून सन्मानित करण्यात आले. केंद्र सरकारच्या १२ प्रमुख योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी आणि नाशिक जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासातील उल्लेखनीय योगदानासाठी श्री.शर्मा यांना हा पुरस्कार ‘जिल्ह्यांचा समग्र विकास’ श्रेणीत मिळाला. १७ व्या नागरी सेवा दिनानिमित्त विज्ञान भवन येथे या पुरस्कार वितरण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. जिल्हाधिकारी जलज शर्मा यांच्या नेतृत्वाखाली नाशिक जिल्ह्याने आयुष्मान भारत, पंतप्रधान आवास योजना, जल जीवन मिशन, उज्वला योजना, मुद्रा योजना, पोषण आहार योजना, स्वनिधी योजना आणि पीएम विश्वकर्मा योजना यासह केंद्र सरकारच्या १२ प्रमुख योजनांच्या यशस्वी अंमलबजावणीत राष्ट्रीय स्तरावर ठसा उमटवला. केंद्र सरकारच्या सर्वेक्षणात नाशिकच्या उत्कृष्ट कामगिरीची दखल घेत श्री.शर्मा यांना हा प्रतिष्ठित पुरस्कार प्रदान करण्यात आला. पंतप्रधान नागरी सेवा सर्वोत्कृष्टता पुरस्कार २०२३ मध्ये करंडक, मानपत्र आणि २० लाख रुपये प्रोत्साहन निधी असे पुरस्काराचे स्वरुप असून, हा निधी नाशिक जिल्ह्यातील लोककल्याणकारी प्रकल्प आणि योजनांच्या अंमलबजावणीसाठी उपयोगात आणण्यात येईल.

## लक्षवेधी छायाचित्र....



आनंद सोहळ्यासाठी स्थळ महत्वाचे नसते...!

(छाया : संजय दारमवार, मुंबई)

# पहलगाम दहशतवादी हल्ल्याचा रोजलँड सोसायटीतर्फे निषेध



**ज्योतिर्मय साहित्य**

**पुणे** – जम्मू – काश्मीरमधील पहलगाम येथे पर्यटकांवर झालेल्या हल्ल्याचा पिंपळे सौदागर येथील रोजलँड सोसायटी सिनियर सिटीझन म्युझिकल ग्रुपच्या वतीने निषेध करण्यात आला. दहशतवाद्यांनी केलेल्या या हल्ल्यात मृत्युमुखी पडलेल्या पर्यटकांना यावेळी श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. सोसायटीच्या आवारात झालेल्या या कार्यक्रमास रमाकांत फुलारी, हरी श्रीवास्तव, अशोक येळंबकर, दिपक सोनी, सुधीर अग्रवाल, शत्रुघ्नलाल गुप्ता, बी.पी.बागुल यांची प्रमुख उपस्थिती होती.



– विद्यावाचस्पती विद्यानंद
Mobile: +917709612655
Email: vidyavachaspati.vidyanand@gmail.com



## आनंदी पहाट...

### तुझे माझे करण्यामुळे वितुष्ट निर्माण होते


ज्योतिर्मय साहित्य

कौटुंबिक कलहांची सुरुवात आर्थिक कारणांमुळे होत असल्याचे अनेकदा समजते. विवाहानंतर उभयतांनी मिळवलेले आपापले उत्पन्न हे स्वतःसाठीसुद्धा न वापरता जोडीदाराने मिळवलेल्या पैशावर हक्क दाखवायचा, त्यांतूनच खर्च करायचा आणि स्वकमाईतून मिळालेला पैसा शिल्लक ठेवायचा. ह्यामुळे निर्माण होणाऱ्या समस्या सोडवण्यासाठी केवळ पैशाचीच गरज भासू लागते. ‘‘स्व‘‘ अर्थ नाही तर ‘‘परम‘‘ अर्थ हीच भावना रुजणे तापदायक, घातक ठरू शकते, ही जाणीव होणे आवश्यक असते. आर्थिक पातळीवर माझे ते माझेच आहे, पण तुझे सुद्धा माझेच आहे, असा विचार करणारी व्यक्ती मानसिक पातळीवर मात्र तुझे–माझे करून मोकळे होताना दिसते. एकाच कुटुंबात राहून देखील प्रत्येकाचा आर्थिक ताळेबंद मात्र स्वतंत्र तयार होतो. त्या ताळेबंदला कोणतेही ताळतंत्र नसते, तो ज्याच्या त्याच्या टाळेबंद कपाटात सुरक्षित ठेवलेला असतो. अनेकदा नकारात्मक विचार, वर्तन आणि व्यवहारामुळे परस्परांमध्ये दुरावा निर्माण होत जातो, गैरसमज वाढत जातात, मतभेद व्हायला लागतात आणि कालांतराने परस्परांविषयी वैरभावना निर्माण होऊ लागते. ह्यामुळे घडत काहीच नाही परंतू सर्वच पातळीवर बिघडायला लागते.

परस्परांच्या भावनांबद्दल नेहमी संवेदनशील राहणे आवश्यक असते. एखादी व्यक्तिगत मागणी पूर्ण झाली नसेल तर नाराज होण्यापेक्षा त्यामागचे कारण समजून घ्यावे, दुसऱ्याची बाजू देखील लक्षांत घेणे आवश्यक असते. काहीवेळा गैरसमजांमुळे अविश्वास निर्माण होत राहतो आणि जोडीदार आपली फसवणूक करतोय असे हळूहळू वाटायला लागते, ते अधिक घातक असते. या नात्यामध्ये कायम गोडवा रहावा असे कोणाला वाटत नाही? असे जरी असले तरी, काहीवेळा हे संबंध बिघडण्याची परिस्थिती निर्माण होते.


## अनोखे अंदमान

ज्योतिर्मय साहित्य





हा बेट कधी काळी ब्रिटिश अधिकाऱ्यांसाठी ‘ईस्टर्न पॅराडाइज’ मानला जायचा. एकीकडे पोर्ट ब्लेअरमध्ये सेल्युलर जेल उभं राहत होतं कैद्यांसाठी नरक बनून, आणि दुसरीकडे इथे ब्रिटिश अधिकारी नृत्यप्रेम, पार्टी आणि आरामात दिवस घालवत होते.

तिथल्या क्लब हाऊसच्या भग्न भिंती आजही सांगतात की इथे पियानो वाजायचा, मखमली वस्त्रातील स्त्रियांचे मादक नृत्य येथे कधीकाळी झाले असेल. ऑफिसर्स व्हिस्कीचा आस्वाद घेत, आणि एका बेफाम सत्तेचा उपभोग घेण्यात मग्न असत. आता येथील सगळ्या इमारतींची पडझड झाली आहे. या भिंती आता वेलींनी व्यापलेल्या असल्या तरी, त्यांचे कोपरे अजूनही हा इतिहास मूकपणे सांगतात. एका टेकडीवरून चालत वर गेल्यावर एका जुन्या चर्चची इमारत समोर येते. हे चर्च आता पूर्णपणे उध्वस्त झालेले आहे. सेंट फिलोमेना चर्च एकेकाळचं भव्य गॉथिक वास्तुशिल्प. आता त्याचं छप्पर गायब आहे, खिडक्यांमध्ये मोकळा आकाश, आणि आत झाडांच्या सावल्या पडल्या आहेत. आता या भग्न इमारतींना निसर्गाने आपल्या कुशीत घेतलं आहे असं वाटतं. त्सुनामीच्या काळात या बेटांचे बरेच नुकसान झालं आणि इमारतींची पडझड झाली. परंतु या बेटाने सुनामीला थोपवून धरल्यामुळे पोर्ट ब्लेअर सारखं महत्त्वाचे ठिकाण सुनामीच्या आक्रमणापासून सुरक्षित राहिलं.




इथल्या उंच टेकडीवरून खाली गेलं की समोरच्या बाजूला सुंदर नीलवर्णाचा समुद्र आपलं मन मोहून टाकतो. या टेकडीवरून खाली समुद्रापर्यंत जाण्यासाठी पायऱ्या आहेत. समुद्राच्या बऱ्याच आतपर्यंत जाण्यासाठी एक पूल बांधला आहे आणि त्याच्या कोपऱ्यावर एक दीपगृह आहे. तिथं उभं राहिलं की आपण जणू त्या सुंदर वातावरणाचा एक भाग होऊन जातो. येथून परतताना एक आश्चर्य आमच्या दृष्टीला दिसलं. तिथे हरण मुक्तपणे बागडत होती. माणसे जवळ आली तरी त्यांना पाहून ती भीतीने दूर पळत नव्हती आमच्यापैकी काही नेत्यांच्या सोबत उभे राहून फोटोही काढले. येथील अनुराधा राव या येथील मोर, हरणांची काळजी घेण्याबद्दल प्रसिद्ध आहेत. त्यांना येथे हिरण महिला म्हणूनच ओळखले जाते. त्यांचा जन्म इथलाच. त्यांचे सारे आयुष्य इथेच गेले सुनामी मध्ये मात्र त्यांचे सगळे कुटुंब नष्ट झाले. **(क्रमशः)**



## दासबोध स्तवन



उज्वला धर्माधिकारी,
पुणे, मो. ७५८८२ ३५६४६

### स्वगुण परीक्षा (ब)

ज्योतिर्मय साहित्य

अधर्माने वागुन स्वतःच्या आयुष्याचे वाटोळे करून घेऊ नका. संयत धीर धर्मरक्षण,स्वकुळाचा ऊद्धार,

अतिलोभापायी वारेमाप धनसंपत्ती गोळा करणे सत्कर्म न करणे दानधर्म नकरणे, आहे त्या धनद्रव्याचा वापर योग्य प्रकारे न करता धनसंपदा साठवून ठेवणे. अशा अवस्थेत घरावर दरोडा पडला तर सगळं धनसंपदा चोर चोरून नेतात व हा कफल्लक होतो.

अशा रितीने वाईट मार्गाने मिळवलेला पैसा संपून जातो व हा माणूस रोगाचे भांण्डार बनतो. संपूर्ण शरीरात रोग पसरतो. केलेल्या पापाची फळे भोगण्याची वेळ येते.तारूण्यातील ऊन्माद संपतो शरीरभर किडे पडतात. कळाहीन देह,हातपाय झडलेले, शरीरात कंप भरलेला.अक्षरशः त्याच्या आसपास पण माणसे थांबत नाहीत सगळा किळसवाणा प्रकार पाहून याची अवस्था ना इहलोकी ना परलोकी अशी झाली. वाईट कर्माचे फळ असे मिळते.पुढच्या ओव्या मध्ये (२२ ते ४६) या ओव्या मध्ये रोगातून बरे होणे मुल होण्यासाठी नवस

सायास करणे थोडक्यात अंधश्रद्धा मनामध्ये ठेऊन करणी, गोसावी, बैरागी, चेटकाचे प्रयोगहीन मंत्रप्रयोग


करणे असे समाज विघातक कर्म त्याच्या कडून होते.

संपूर्ण समासाचा सार विचारात घेता अधर्माने वागू नका नितीधर्माचे पालन करा भगवंताशी एकरुप व्हायला विसरू नका. असेच समर्थ सांगतात.

सद्गुणांचा अवलंब करून देहाचे सोने करावे. भगवंताची ऊपासना करावी. हे या निमित्ताने सांगणे.

श्री राम जय राम जय जय राम।।

## साधनांनी जे साधत नाही ते संतसहवासाने साधते



**श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज**

ज्योतिर्मय साहित्य

अवतारी संत आणि इतर संत यांच्यामध्ये फरक असतो. अवतारी संत हे ज्ञानेश्वर महाराजांसारखे किंवा समर्थांसारखे असतात. ते आपण होऊन येतात, आणि आपले काम झाले की जातात; मग ते राहात नाहीत. संतांनी जगातली राज्ये मिळविली नाहीत. पण त्यांनी स्वत:वर राज्य केले. चमत्कार करणे हे संतलक्षण नव्हे. चमत्कार सहजगत्या होतील तर होवोत, चमत्कार दाखवावा म्हणून संत चमत्कार करीत नाहीत. संतांची निंदा किंवा अपमान करू नये. त्यांची परीक्षाही पाहू नये. कोणाचेही वाईट चिंतू नये. दुसऱ्याचे हित करावे, हितच चिंतावे. उत्तम हित नामावाचून अन्य कशातही नाही. म्हणून अखंड भगवन्नाम जपणे ही संतसंगतच आहे. सद्विचार ही एक सत्संगतच आहे. ध्यान, स्मरण, मनन आणि सद्ग्रंथवाचन यांमुळे संतांची गाठ पडून त्यांच्याशी समागम होणे शक्य होईल.

संतसमागमात राहून विषय मागणे हे समागमाचे रहस्य नाही. एकुलत्या एका मुलाने अफूच्या गोळीसाठी हट्ट धरला, तर आई त्याला ती गोळी देईल का ? जर तिने ती दिली, तर ती खरी आईच नव्हे. त्याप्रमाणे, जो विषयाचे प्रेम देईल तो खरा संत नव्हे. संताला विषयाचे प्रेम असत नाही. इतकेच नव्हे, तर त्याचा माणूस विषयात राहिला तर त्याच्या हृदयाला पीळ पडतो. कुत्रा हाड चघळीत असताना आपल्याच तोंडातले रक्त पिऊन, ते त्या हाडातून येते आहे असे समजतो आणि शेवटी त्यातच मरतो. हे पाहून जितके वाईट वाटेल त्याच्या दसपट, नव्हे अनेकपट, आपण विषयमग्न असलेले पाहून संतांना वाईट वाटते.

संतांनी खरे भगवंताला जाणले. जिज्ञासू शिष्य भेटला तर संताला आपले स्वत:चे सार्थक झाले असे वाटते. साधनांनी जे साधत नाही ते संताच्या सहवासात राहिल्याने साधते. मनुष्य जितका नि:स्वार्थी तितकी त्याची भाषा व्यापक असते. तुमच्या–आमच्या घरातले लोकसुद्धा आपले ऐकत नाहीत, पण संतांची वाणी सर्व जगावर परिणाम करते, कारण ती सर्वव्यापक असते. ती अत्यंत तळमळीची असते. याच अर्थाने श्रुती सनातन आहे. जगाचे कल्याण व्हावे म्हणून ऋषी बोलले, म्हणून त्या वाणीने जगाचे कल्याण व्हायचेच, आणि जगाचे कल्याण व्हावे असे वाटते तोपर्यंत ती वाणी राहायचीच.

आहे त्यात समाधान मानणे, कोणाचाही द्वेष–मत्सर न करणे, सर्व भगद्रूप मानणे, निरभिमान राहणे, सदोदित भगवन्नामस्मरण करणे, आणि संत, सज्जन, सद्गुरू यांच्याविषयी पूज्यभाव ठेवणे या गोष्टी आचरणात आणणे हाच परमार्थ. यांत कोणती गोष्ट अवघड किंवा खर्चाची आहे ? आम्ही निश्चयाने ती करीतच नाही म्हणून समाधान येत नाही. या गोष्टींप्रमाणे आचरण ठेवले तर समाधान येईलच.


प्रपंचात कसे वागावे हे संत शिकवितात आणि वागून दाखवितात.

## ॥ संत - महात्म्य ॥

**संकलन : मधुकर बोरीकर**
**9403061886 (स्त्रोत:- इंटरनेट)**

### संत श्रेष्ठ श्री तुलसीदासजी

ज्योतिर्मय साहित्य



साहित्यिक दृष्टीने जरी विचार केला तरी तुलसीदासजींच्या रचनेमध्ये कोणताही दोष काढणे हे सोपे काम नाही. श्री राम चरित्र मानस याची प्रसिद्धी संपूर्ण जगतात वाढायला लागली हे पाहून काशीच्या पंडितांना मनात इर्षा उत्पन्न झाली. ते जमेल तेवढा त्यास विरोध आणि निंदा करण्याच्या प्रयत्नाला लागले. एकदा त्यांनी दोन विख्यात चोरांना रामचरीत मानस हा लिखित ग्रंथ चोरून आणण्यास सांगितले. जेव्हा हे चोर तुळशीदासजीच्या झोपडीत घुसण्यासाठी प्रयत्न करत होते, तेव्हा त्यांनी हे पाहिले की बाहेर दोन शूर युवक योद्धे हे झोपडीच्या रक्षणासाठी धनुष्य बाण घेऊन सज्ज आहेत. ते दिसायलाही सुंदर, मोहक होते. एक शाम वर्णाचा तर एक गौरवर्णाचा होता. या दोन युवकांना पाहून चोरांची बुद्धी शुद्ध झाली. त्यांच्या मनातील चोरी करण्याची वासना तात्काळ गळून पडली. आणि ते सरळ जाऊन तुळशीदासजींच्या चरणावर वीनम्र झाले. तुळशीदास यांना जेव्हा ही कळाले की आपल्यासाठी भगवंत रात्री पहारा देत आहेत तेव्हा त्यांना अपराधीपणाची जाणीव झाली.आपल्या झोपडीतील या वस्तूंचा मोह आपणास नडतो आहे.त्यासाठी प्रभुस आपल्या वस्तू राखण्यास साठी बाहेर पहारा द्यावा लागावा ही किती शरमेची गोष्ट आहे.सेवकाने स्वामीची सेवा करावी तर इथे आपल्या मोहापोटी हे उलटेच घडले.मी किती मोठा पापी आहे असे विचार त्यांच्या मनी येऊ लागले. त्यांनी आपली घरातील सर्व संपत्ती दान देऊन टाकली आणि तोडरमल नावाच्या मित्रास राम चरित मानस हे पुस्तक त्यांनी सांभाळण्यासाठी दिले. हा तोडर्मल अकबर बादशहाच्या पदरी नवरत्न पैकी एक होता.

तुलसीदास यांनी हा ग्रंथ त्याच्याकडे सुपूर्त केला तरी, त्यांची प्रतिभा आणि विलक्षण स्मरणशक्तीच्या जोरावर संपूर्ण ग्रंथ अगदी तसाच त्यांनी पुन्हा लिहून काढला आणि नंतर त्याच्या अनेक प्रति सुद्धा तयार केल्या. तुलसीदासजी काशीच्या तुलसी घाटावर रहात. त्यांच्या कडून राम कथा ऐकण्यासाठी अलोट गर्दी जमा होई. एके दिवशी कलियुग, मनुष्य रूप धारण करून तुलसीदासजी यांच्याकडे आले व त्यांना त्रास देण्यास सुरुवात केली. त्याच क्षणी तुलसीदास यांनी हनुमंतरायाचे ध्यान केले.तत्क्षणी हनुमंत राय साक्षात प्रकट झाले. त्यांनी कलियुगापासून होणारी पीडा लगेच नष्ट केली. आणि त्यांनी सांगितले की तुम्ही प्रार्थना पर पद्यरचना करा. यानंतर तुळशीदासजीने त्यांची अंतिम कृती विनय पत्रिका ही लिहिली. आणि ही विनय पत्रिका त्यांनी भगवान श्रीरामांच्या चरणावर समर्पित केली. प्रभू श्रीरामांनी त्यावर स्वतःचे हस्ताक्षर करून तुलसीदास यांना त्यांच्या स्विकृतीची जणू पुष्टी केली.

त्यांनी आपणा सर्वांना एक प्रयोग दिला ‘‘सिया राम सरूप सब जग जानी करहू प्रणाम जुग जोड पानी

या जगतातील सर्व स्त्री शक्तीला माता सीता व सर्व पुरुषांना प्रभू श्री राम समजून विनम्र भावाने हात जोडून नमस्कार करा.

प्रेम आटलेल्या जा जगात प्रेम वृद्धीसाठी वरील प्रयोग सतत गिरवायला हवा. हा प्रयोग या संत श्रेष्ठी निश्चितच काटेकोरपणे गिरवायला होता म्हणूनच तो आपणास तो दिला आहे.

संवत १६८० श्रावण शुक्ल सप्तमी या दिवशी राम राम असे म्हणत तुलसीदासजी यांनी आपला ११२ वर्षाचा प्रदीर्घ जीवन काल संपवीत या शरीराचा त्याग केलां

भगवत भक्तीचे मळे सर्वत्र फुलविणाऱ्या या महान संतास विनम्रतेने प्रणाम करून हा भाग इथे संपवूयात श्रीराम जय राम जय जय राम/ श्रीराम जय राम जय जय राम//

***



## नीतिशतक निरूपण

अनुवाद आणि निरूपण
ह.भ.प.चंद्रहास शास्त्री सोनपेठकर

ज्योतिर्मय साहित्य

**नम्रत्वेनोन्नमन्तः परगुणकथनैः स्वान् गुणान् ख्यापयन्तः**
**स्वार्थान् सम्पादयन्तो वित्तपृथुतरारम्भयत्नाः परार्थे।**
**क्षान्त्यैवाऽऽक्षेपरुक्षाक्षरमुखरमुखान् दुर्जनान् दूषयन्तः**
**सन्तः साश्चर्यचर्या जगति बहुमताः कस्य नाभ्यर्चनीयाः ।।**

अर्थ – विनयाने उन्नत होणारे, दुस–याच्या गुणांचा कथनाद्वारे आपल्या गुणांना प्रकाशित करणारे, महान परोपकाराने आपला स्वार्थ संपादित करणारे, आक्षेपाच्या रुक्ष शब्दांनी मुखर अशा दुर्जनांना क्षमा करूनच दोष देणारे असे विस्मयकारी सज्जन लोक जगात सन्मानित होऊन कोणाच्या बरे आदरास पात्र ठरत नाहीत?

ज्जन माणसांचा सर्वत्र आदर होतो. कारण ते विनम्रतेने मोठे होतात, विकसित होतात. ते आत्मश्लाघा करीत नाहीत; तर इतरांच्या गुणांची प्रशंसा करतात; यातून त्यांचे गुण प्रकट होतात. महान अशा परोपकाराने सर्वांना कृतार्थ करून ते आपला स्वार्थ साध्य करतात. आणि ज्यात स्नेहाचा ओलावा नाही असे आक्षेपांचे रुक्ष शब्द उच्चारणा–या दुर्जनांना ते क्षमा करूनच दोष देतात, अर्थात दुर्जनांच्या पातळीवर जाऊन त्यांच्यावर सज्जन लोक दोषारोपण करीत नाहीत. अशा सज्जनांचा सर्वत्र आदर केला जातो, असा आशय या श्लोकात कवीश्रेष्ठ भर्तृहरींनी सांगीतला आहे.

## ॥ श्री राम कथा ॥





**वक्ते : आदरणीय श्री चैतन्य महाराज देगलूरकर**

ज्योतिर्मय साहित्य

त्यावेळी लव कुश तिथे आले. त्यांना पाहून वाल्मिकी यांना या श्रेष्ठ काव्याचा प्रचार प्रसार कसा करावा याचे उत्तर सापडले. त्यांना वाल्मीक यांनी संपूर्ण रामायण पाठ करायला लावले. २४००० श्लोक लव व कूश यांनी पाठ केले. त्याची चाल, रागदारी, अभिनय कसा हे सर्व शिकविले. तरबेज केले.त्यांना सांगितले तुम्ही समाजात जा त्यांना हे गाऊन दाखवा.

**कथा ऐकता ऐकता धावते संकलन**
**मधुकर बोरीकर, 9403061886**

रामायण गाण्यासाठी हे अयोध्येस केव्हा पाठवावे यावर त्यांनी विचार केला आणि त्यांना योग्य वेळ सापडली.रामचंद्र प्रभुंनी अयोध्येत अश्वमेध यज्ञ ठरविला होता. तिथे लव व कुशल यांना पाठविन्याचे ठरले.त्या आधी आश्रमातील जाणकार ऋषी मुनींसमोर रामायनाची रंगीत तालीम करवून घेण्यात आली..कुश लव यांना विरक्तांसमोर रामाची कथा करायला लावली.राम कथा विणेवर करावी असे सांगितले आहे. श्रोते विरक्त असूनही यांची कथा ऐकून ते घळा घळा रडत होते.मुलांची अभिव्यक्ती उत्कृष्ट होती.

तुम्ही अयोध्ये जा कथा करा, पण नियम पाळा.द्रव्य घ्यायचे नाही जेवण तिथे करू नका. सार्वजनिक ठिकाणीच कथा करा. आधी आईची परवानगी घ्या.कुश लव आईकडे आले. तोवर आपण कोण, कोणाचे पुत्र आहोत. हे त्यांना माहिती नव्हते. आम्ही अयोध्येस जाणार हे ऐकताच सीता विचार मग्न झाली. तिला परवानगी देववेना. जेव्हा त्यांनी सांगितले की, आई हे वाल्मीक ऋषी नी सांगितले आहे. मग ती हो म्हणाली.

**(क्रमशः)**



## आरोग्य संजीवनी

### थायरॉईडपासून सुटका

ज्योतिर्मय साहित्य

दररोज कोथिंबिरीचे पाणी प्यायले तर मधुमेह नियंत्रित होईल !

आज अनेकांना आजारांचा सामना करावा लागत आहे. यात प्रामुख्याने मधुमेहाचा समावेश आहे. अनेकदा आपली जीवनशैली वेगळी राहिल्या कारणामुळे खाण्यापिण्यापासून शारीरिक हालचालींची विशेष काळजी घेण्याचा सल्ला दिला जातो.

अशा परिस्थितीत धणे त्यांच्यासाठी खूप फायदेशीर ठरु शकते. कोथिंबिरीच्या पानांपासून ते धणे यासाठी उपयुक्त आहे. कोथिंबीर आपल्या स्वयंपाकघरात वापरली जाते. त्यामुळे पाककृतींची चव तर सुधारतेच, पण ते शरीरासाठीही फायदेशीर असते.

आपल्या घरातील धणे हा मसाला पदार्थ मधुमेहाच्या रुग्णांसाठी फायदेशीर आहे. कोथिंबिरीच्या बियां(धणे)मध्ये दाहक–विरोधी आणि अँटी–बॅक्टेरियल गुणधर्म आढळतात, म्हणूनच त्याचा नियमित रोजच्या आहारात समावेश केला पाहिजे.

कोथिंबिरीने रक्तातील साखर नियंत्रित राहते. रक्तातील साखरेची पातळी कोथिंबिरीने नियंत्रित करता येते. हा उपाय आजी–आजोबांच्या काळापासून चालत आलेला आहे आणि खूप प्रभावी देखील आहे. अशी काही संयुगे त्याच्या बियांमध्ये आढळतात जी रक्तात विसर्जित झाल्यावर हायपरग्लायसेमिक विरोधी, इन्सुलिन डिस्चार्जिंग यांसारख्या क्रियाकलापांमध्ये उपयुक्त ठरू शकतात.

**संकलन –**
**डॉ. प्रमोद ढेरे (निसर्ग उपचार तज्ञ)**
**पिंपरी–चिंचवड, पुणे.**
**आरोग्यविषयक व्याख्याते व लेखक**
**संपर्क – ९२ ७१ ६६९ ६६९**


जर तुम्ही दररोज कोथिंबिरीचे पाणी प्यायले तर मधुमेह नियंत्रित करणे सोपे होईल, कारण ते इन्सुलिनचा स्राव वाढवून रक्तातील साखर नियंत्रित करते, ज्यामुळे मधुमेहाच्या रुग्णांचे आरोग्य सुधारते.


कोथिंबीरीचे पाणी कसे तयार करावे?

मधुमेहाच्या रुग्णांसाठी फायदेशीर समजले जाणारे कोथिंबीरीचे पाणी अगदी सहज तयार करता येते, तुम्ही रात्री एक ग्लास पाण्यात अखे धणे भिजत ठेवा. नंतर सकाळी उठून ते पाणी गाळून कोथिंबीरच्या मदतीने प्या. आपण इच्छित असल्यास, आपण कमी प्रमाणात देखील पिऊ शकता, असे केल्याने ग्लुकोजची पातळी कमी होईल.

**(क्रमशः)**

## रवींद्रनाथ टागोर





विश्वास देशपांडे,
चाळीसगाव
मो. ९४०३७४९९३२

### रवींद्रनाथ टागोर : वारसा आणि कार्य

ज्योतिर्मय साहित्य

रवींद्रनाथांच्या लेखणीला मिडास टच होता असे म्हणता येईल. त्यांनी ज्या ज्या साहित्य प्रकाराला हात लावला, त्याचे सोने झालं. कादंबरी या प्रकारात लेखन करताना काही नवीन प्रयोगही त्यांनी केले. काही ठिकाणी कथा पुढे नेण्यासाठी आत्मनिवेदनाचे तंत्र वापरले. साहित्यकृतीतील सौंदर्य हे साध्य नसून साधन आहे असे ते मानत होते. तसेच साहित्यिकाने कलेचा आणि परिस्थितीचा सुरेख संगम घडवून आणला पाहिजे असे त्यांना वाटत होते. एखादी साहित्यकृती जेव्हा मानवी जीवनाशी एकरूप होते तेव्हाच तिच्यातून चिरंतन मूल्य प्रकट होतात असे ते मानत होते. यातूनच एखादी साहित्यकृती कशी असावी हे ही स्पष्ट होते. मानवी जीवन आणि त्यातील भावभावना समृद्ध करण्याचे कार्य रवींद्रनाथांच्या कादंबऱ्यांनी केले आहे. रवींद्रनाथांनी एकूण १४ कादंबऱ्या लिहिल्या पण त्यांच्या कादंबऱ्यांच्या संख्येबद्दल समीक्षकांमध्ये मतभेद आहेत कारण नष्टनीड, दुई बोन, मालंच आणि चार अध्याय यासारख्या त्यांच्या साहित्यकृतींना काही मान्यवर लेखकांनी दीर्घकथा म्हटले आहे.

चौखेर बाली ही त्यांची कादंबरी अतिशय वाचकप्रिय झाली. या कादंबरीत अत्यंत गुंतागुंतीच्या मानवी भावभावनांचे चित्रण त्यांनी केले आहे. काम, क्रोध, मद, मत्सर आदी भावना किती प्रभावी असतात आणि त्यामुळे मानवी जीवनात किती परिवर्तन घडून येत असते याचे सुरेख वर्णन करणारी ही कादंबरी आहे. या कादंबरीत एक सुंदर सुस्वाभावी मुलगी आपल्या पतीच्या अकाली निधनामुळे विधवा होते आणि तिच्या नैसर्गिक भावभावना दडपल्या जातात.



## जात्यावरच्या ओव्या.....

**नातेसंबंध : नणंद-भावजय**

*मांडवाच्या दारी*
*उभी राहिली कवाची,*
*आल्या भावजया*
*वाट पाहते भावाची ||४४||*

*कपाळाचं कुंकू*
*घामानं रया रया*
*वहिनी दादाची लाडकी*
*नांदती अनुसया ||४५||*

संदर्भ- शांताई इंगळे
संकलन- सौ. मनोरमा बोराडे
सहशिक्षिका, छत्रपती संभाजीनगर

# अमेरिकेत घडणारं दोन अंकी भावस्पर्शी नाटक 'तू भेटशी नव्याने'




ज्योतिर्मय साहित्य

गेल्या काही दशकांपासून भारतातून अनेक मध्यमवर्गीय कुटुंबातील मुलं मुली शिक्षणाकरता अमेरिकेत जातात, शिक्षण घेऊन तिथेच नोकरी मिळवतात, संसार थाटतात आणि अमेरिकेतच स्थायिक होतात. वरवर पाहता सगळं छान असतं..भरपूर पगाराची नोकरी, बंगला, गाडी, खिशात डॉलर्स, सुबत्ता, मौज- मजा आणि दिमतीला सर्व काही...

हे सर्व अमेरिकेत राहत असले तरी त्यांची पाळमूळं मात्र भारतीय असतात. एवढ्या ऐशोआरामात असूनही त्यांना सतत भारताची आठवण येत असते .. आपले नातेवाईक, मित्र मैत्रिणी, आपले सण, आपल्या परंपरा, संस्कार..हे सगळं आठवत राहतं! भारतात येण्याची ओढ असते! पण अमेरिकेतच जन्मलेली त्यांची मुलं मात्र संपूर्ण अमेरिकन असतात..भारताबद्दल आत्मीयता नसते, आपली संस्कृती, आपल्या परंपरा याच्याविषयी वरवरची माहिती असते पण आदर नसतो.. भारतातील आपल्या नातेवाईकांबद्दल ही मुलं फक्त ऐकून असतात.. त्यांच्याशी फार संपर्क नसतो आणि त्यामुळे ओढही नसते. प्रश्न एवढ्यावरच संपत नाहीत.. अमेरिकेतही सगळं आलबेल असतं का ? तर याचं उत्तर नाही असंच द्यावं लागेल ! अनेकदा वेगवेगळ्या विचित्र घटना तिथेही घडत असतातच !

गेली अनेक वर्ष अमेरिकेत शिकागो येथे स्थायिक असलेलं कानेटकर कुटुंब हे याचं प्रातिनिधिक उदाहरण म्हणता येईल! हरिहर आणि नीलिमा कानेटकर हे अत्यंत उच्चशिक्षित, भारतातून अमेरिकेत स्थायिक होऊन शिकागो येथे स्वतःचा व्यवसाय उभा करून तिथल्या समाजात स्वतःचं मानाचं स्थान मिळवलेलं दाम्पत्य!

त्या दोघांच्या एकुलत्या एक मुलीचे.. हनीचे अमेरिकन मित्र-मैत्रिणी.. ती हाणामारी, गुंडगिरी, ड्रग्ज यांच्या आहारी गेलेली.. तिला भारताबद्दल प्रचंड तिटकारा ! वाईट मार्गाला लागल्यामुळे वाया गेली आहे असं वाटत असतानाच एका अघटीत प्रसंगामुळे नाईलाजाने तिला भारतात यावं लागतं.

भारतात आल्यावर ती सुधारते का? भारताविषयीचा तिचा दृष्टिकोन बदलतो का ? आपल्या माणसांची ओळख तिला पटते का?

भारतीय मूल्यांचं, नात्यांचे महत्त्व तिला पटतं का?

या सर्व प्रश्नांची उत्तरं अमेरिकेतील मराठी मनाचा आरसा दाखवणाऱ्या तू भेटशी नव्याने या नाटकातून आपल्याला पाहायला मिळतात.

त्याचबरोबर देश प्रेम जागृत करणारा एक सुंदर संदेशही हे नाटक आपल्याला देतं.

या नाटकाचे आत्तापर्यंत पुणे, मुंबई, नाशिक, सोलापूर, कोल्हापूर, जयसिंगपूर,

**भाग्यश्री देसाई**
**(रसिकमोहिनी)**

इस्लामपूर , इचलकरंजी, सांगोला, सातारा , तळेगाव आदी अनेक ठिकाणी प्रयोग झाले आहेत; हाऊसफुल्ल चे बोर्ड झळकवले आहेत.

अल्पावधीत या नाटकाने आपला सुवर्ण महोत्सवी (पन्नासावा) प्रयोग थाटात साजरा केला. यावेळी गश्मीर महाजनी सह अनेक कलाकार आणि मान्यवर उपस्थित होते.

या नाटकाला दोन बालगंधर्व पुरस्कार प्राप्त आहेत, आणि झी नाट्य गौरव, सांस्कृतिक कलादर्पण, आर्यन अवॉर्ड्स आदीची नऊ नामांकने प्राप्त आहेत.

रसिकमोहिनी आणि एफ् एफ् टी जी निर्मित तू भेटशी नव्याने नाटकाचे लेखन राजन मोहाडिकर यांनी केलं असून पुरुषोत्तम बेर्डे यांनी दिग्दर्शन, नेपथ्य, प्रकाशयोजना, संगीत, आणि वेशभूषा केली आहे. दीपक करंजीकर, चिन्मय पाटसकर, मेधा पाठक, अमृता पटवर्धन आणि भाग्यश्री देसाई या अनुभवी कलाकारांनी समरसून आपापल्या भूमिका साकार केल्या आहेत. अमेरिकेतील अत्यंत उच्च प्रतीचं सुशोभित घर दाखवणारं नेपथ्य, नेत्र सुखद रंगसंगती आणि प्रकाश योजना, सुमधुर पार्श्व संगीत.. यामुळे प्रेक्षक नाटक पाहताना भारावून जातात. या नाटकात दृकश्राव्य माध्यमाचा अतिशय खुबीने वापर केला आहे. कै. सुहासिनी देशपांडे सारख्या ज्येष्ठ अभिनेत्रीसह चंद्रशेखर भागवत, प्रिया नेर्लेकर यांनी यात मोलाची साथ दिली आहे.

रसिकमोहिनी च्या भाग्यश्री देसाई या तू भेटशी नव्याने नाटकाच्या निर्मात्या असून एफ् एफ् टी जी चे झरीर इराणी आणि मोहनदास प्रभू हे सहनिर्माते आहेत.

अत्यंत वेगळा विषय असलेलं असं नाटक मराठी रंगभूमीवर प्रथमच आलं आहे.

नात्यांची घट्ट गुंफण विणणारं, आणि अतिशय उच्च दर्जाची निर्मिती मूल्य असलेलं हे महत्त्वाचं नाटक प्रेक्षकांना एक सुखद अनुभूती आणि सकारात्मक ऊर्जा देतं हे नक्की !

**संस्कृती व संस्कार**



विभावरी कुलकर्णी,
मो. ८०८७८१०१९७

### गोष्टी प्राण्यांच्या १२

ज्योतिर्मय साहित्य

प्राण्यांचा सहवास त्यांचे अनुभव गमतीशीर व कायम लक्षात राहतील असे होते आणि आहेत. गंमत म्हणजे ज्या कुत्र्याची मला भीती वाटायची ती माझ्या कायम आजूबाजूला आणि जवळ असायची. आणि मी अंग चोरून त्यांच्या पासून लांब रहायची. त्यावेळी जवळपास सगळ्यांच्या कडे शेती असायची. आणि राखण करण्यासाठी हमखास किमान एक तरी कुत्रा असायचाच. आणि शेताची छान राखण करायचा. गावातील कुत्री उंच, धिप्पाड आणि चपळ असायची. त्यांची नावे पण लाल्या, राजू, मोती अशी अस्सल भारतीय असायची.

आमच्या एका नातेवाईकांच्या कडे एक कुत्रा होता. आम्ही बैलगाडीतून कुठे जायला निघालो की तो कितीही अंतर बैलगाडी बरोबर यायचा. जणू आमच्या रक्षणाची जबाबदारी त्याच्यावरच होती. एकदा एक बाळ रांगत ओसरीच्या कडेला पोहोचले. ते खाली पडणार तितक्यात या मोत्याने त्याचे झबले तोंडात धरून त्याला मागे आणले. बरेचदा या प्राण्यांना भिऊन माणसांचे गैरसमज होतात. आणि काही प्राण्यांना त्यात आपला जीव गमवावा लागतो. मी काही कुत्री अशी पण बघितली आहेत की मालक निवर्तल्यानंतर खाणे पिणे बंद करतात. किंवा मृत्यू पावतात. घरातील कोणी घराबाहेर गेले तर त्या व्यक्तीची वाट बघत असतात. आणि ती व्यक्ती परत आली की आपल्या पद्धतीने आनंद व्यक्त करतात. बरेचदा ही त्यांची वाट बघण्याची एनर्जी बाहेर गेलेल्यांना सुखरूप घरी आणते.

माझ्या आजोळी एक असेच मोठे कुत्रे होते. त्याचा आवाज इतका मोठा होता, की तो ऐकूनच घरात शिरलेल्यांची भीतीने गाळण उडायची. एकदा तर त्याने वाड्यात शिरलेल्या चोरांवर वरच्या मजल्या वरील गॅलरीतून उडी मारली होती. आणि चोरांना पळवून लावले होते.

असे अनुभव जरी घेतले होते, तरीही मला कुत्र्याची अतिशय भीती वाटायची. आणि मी झोपले की घरातील कुत्रा नेहेमी पाय चाटायचा. मला त्याची अजूनच भीती वाटायची.

आणि आपल्याकडे मराठीत काही म्हणी आहेत. ''ज्याचा कंटाळा त्याचा वानवळा'' जे करायला आवडत नाही तेच समोर येते. असाच काहीसा अनुभव पुढे आयुष्यात आला. आणि कुत्र्यांशी चांगली मैत्री झाली. कसे ते पुढच्या लेखात बघू.

# नव्या बदलाची नांदी ! भारतीय विद्यार्थ्यांना आता ऐ आय आधुनिक तंत्रज्ञानावर आधारित शिक्षण !!

ज्योतिर्मय साहित्य
(मागील अंकावरून)

३) माध्यमिक स्तरावर ६वी ते ८वी चे वर्ग मोडतील. त्यामध्ये ११ ते १३ या वयोगटातील मुलांचा समावेश असेल. १. त्यांना गणित, विज्ञान, सामाजिक शास्त्रे, कला आणि मानव्य विद्यांचे शिक्षण दिले जाईल. २. शालांत परीक्षा स्तरामध्ये इयत्ता ९वी ते १२वी पर्यंतचे वर्ग मोडतील. ह्या गटामध्ये १४ ते १८ या वयोगटातील विद्यार्थ्यांचा समावेश असेल. हा किशोरावस्थेचा काळ असल्याने ह्या काळात विद्यार्थ्यांना उच्चशिक्षणासाठी आकार देण्याचे कार्य करण्यात येईल. वर्ग ९ ते १० व ११ ते १२ अशा दोन भागात हा अभ्यासक्रम विभागला जाईल. त्यामध्ये अनेक ऐच्छीक विषयांचा समावेश असेल व विद्यार्थ्यांमध्ये सखोल व चिकित्सक अध्ययन प्रणाली विकसीत करण्यावर भर दिला जाईल. त्यामुळे विद्यार्थ्यांना आपली आवड जोपासता येईल.

विद्यार्थ्यांना दरवर्षी परीक्षेचे ओझे असणार नाही. दुसऱ्या, पाचव्या व आठव्या इयत्तांसाठी वर्षातून तीन परीक्षा असतील. १०वी व १२वी च्या बोर्ड परीक्षा कायम असतील, पण त्यांची नव्याने आखणी करण्यात येईल. उच्चस्तर परीक्षा मंडळ त्याचे निकष ठरवणार असून कामगिरीचे मूल्यमापन तज्ज्ञांकडून समालोचन व विश्लेषण या आधारे सर्वंकष सर्वांगीण विकासाचे यथार्थ मापन करण्यात येईल.

परीक्षा वर्षातून दोन वेळा घेतल्या जातील व विद्यार्थ्यांना दोन संधी दिल्या जातील. प्रश्न वस्तुनिष्ठ व वर्णनात्मक दुहेरी स्वरूपाचे असतील. विद्यार्थ्यांवर शिक्षणाचा भार ओझे पडू नये, त्यांना आंतरविद्याशाखीय व बहुभाषिक जीवनोपयोगी शिक्षणात गोडी वाटावी असे प्रयत्न केले जातील. एखाद्या विद्यार्थ्याला पदार्थविज्ञानाबरोबर फॅशन तंत्रज्ञान आणि दुसऱ्याला रसायनशास्त्राबरोबर बेकरीचा विषय निवडता येईल. विद्यार्थ्यांच्या कौशल्यवृद्धीचा सर्वंकष विचार केला जाईल. सहाव्या वर्गापासून कोचिंगवर भर दिला जाईल. तसेच अनुभवावर आधारित शिक्षणावर विशेष लक्ष दिले जाईल. सध्या प्रचलीत असलेली माध्यान्ह भोजन योजना कायम राहील तसेच शाळांतून मुलामुलींना उत्तम न्याहरी देण्यात येईल. विद्यार्थ्यांच्या आरोग्याकडे लक्ष देण्यात येईल व त्यांच्यामध्ये सामाजिक कार्याची आवड निर्माण होईल असे संस्कार करण्यात येतील.

उच्च शिक्षणामध्ये क्रांती:

नवीन शैक्षणिक धोरणामध्ये उच्च शिक्षण क्षेत्रामध्ये गुणवत्ता आणि क्षमता संवर्धनासाठी महत्त्वपूर्ण बदल घडवून आणले आहेत. चार वर्षांचा बहुविद्याशाखीय पदवी अभ्यासक्रम नियोजित करण्यात आला आहे. त्यानुसार अनेक व्यावसायिक अभ्यासक्रमांचे विषय समाविष्ट करण्यात येतील व पदवीचा जीवनाशी संबंध जोडण्यात येईल. या अभ्यासक्रमामध्ये पहिल्या वर्षाच्या पूर्तीनंतर विद्यार्थ्याला प्रमाणपत्र मिळेल. दोन वर्षांचा अभ्यास पूर्ण केल्यानंतर पदविका मिळेल. तीन वर्षांनंतर पदवी प्राप्त होईल. महत्त्वाचे व आवडीचे ऐच्छीक विषय निवडून अंतिम चौथे वर्ष संशोधनदृष्टी देणारे असेल. भारतीय विद्यापीठातील एम.फिल. अभ्यासक्रम बंद करण्यात येतील. पाश्चात्त्य मॉडेलनुसार ही नवी मांडणी असेल. पदवीनंतरही पी.एच.डी. साठी संशोधन करता येऊ शकेल.

उच्च शिक्षण नियमनासाठी ''उच्चशिक्षण मंडळ असेल व त्याच्या देशभर चार शाखा असतील. नॅशनल हायर एज्युकेशन रेग्युलेटरी काऊन्सिल ही शिक्षण या विषयासह सर्व विद्याशाखांचे नियमन करेल. वैद्यकीय व विधी शिक्षण मात्र त्यामध्ये समाविष्ट नसेल. त्यासाठी स्वतंत्र नियामक मंडळे असतील. नॅकचे कार्यक्षेत्र वाढविण्यात येईल. जी.ई.सी. जनरल एज्युकेशन कौन्सिल प्रस्थापित करून त्या आधारे शैक्षणिक फलश्रुतीचे आकलन केले जाईल. उच्चशिक्षणातील गुणवत्ता वाढीसाठी व्यवस्था व आराखडा विकसित करण्याचे कामही केले जाईल. एन.सी.ई.टी.ई. व अन्य शैक्षणिक गुणवत्ता यंत्रणा या जी.ई.सी. अंतर्गत कार्य करतील. प्रोफेशनल स्टॅण्डर्ड सेटींग बॉडी मध्ये पशुवैद्यक, कृषी व्यावसायिक शिक्षण या परिषदांचाही समावेश होईल व त्या सर्वांच्या कार्यामध्ये मूलभूत सुसूत्रता आणणे शक्य होईल. नॅशनल टेस्टींग एजन्सीकडे देशभरातील विद्यापीठांच्या प्रवेशाचे काम सोपविण्यात येईल. त्यामुळे देशभरातील व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रक्रिया सुरळीत होतील. त्यांची प्रवेशप्रक्रियाही गतीने व कार्यक्षमतेने निर्धारित वेळेत पूर्ण होऊ शकेल. जे.ई.ई. व नीटचे कामही हीच यंत्रणा पाहील. सर्वत्र देशभरातील विविधता लक्षात घेऊन आय.आय.टी. सारख्या प्रगतस्तर संस्थांनी त्यांच्या अभ्यासक्रमात उपयुक्त बदल करावेत अशी अपेक्षा आहे. स्वायत्त व खाजगी विद्यापीठांचे प्रवेश शुल्क हे सुनिश्चित करण्यात येईल.



**डॉ. वि. ल. धारूरकर, पुणे**
**मो. ९२२५३१३५९२**

भारताची विश्वगुरूत्वाकडे वाटचाल:

विदेशी विद्यापीठांना भारताकडे आकर्षित करण्यात २०१२चा प्रयत्न अयशस्वी झाला. नव्या धोरणानुसार विदेशी विद्यापीठांना भारतामध्ये प्रवेशाची संधी दिली जाणार आहे व भारतातील आय. आय.टीं. नाही परदेशात शाखेचा विस्तार करण्यास परवानगी देण्यात येईल. प्राचीन काळामधील भारतीय विद्यापीठे म्हणजे नालंदा, तक्षशीला, विक्रमशीला यांचे वैभव पुन्हा प्राप्त करून द्यायचे व भारताला जगात विश्वगुरुच्या श्रेष्ठ पदावर पोहोचवायचे हे या नवीन धोरणाचे अंतिम लक्ष आहे हे यावरून स्पष्ट होते. हे लक्ष्य साध्य करण्यासाठी या धोरणात नियोजित आराखडा कालबद्धपणे विकसित करण्यावर भर दिला आहे.

प्रगत तंत्रज्ञानावर आधारित शिक्षण :

भारतातील प्राथमिक स्तरापासून उच्चशिक्षणापर्यंत शिक्षणाचा विस्तार हा प्रगत माहिती तंत्रज्ञानाच्या आधारे करण्यावर नवीन धोरणामध्ये विशेष प्रयत्न करण्यात येणार आहे. त्यासाठी शिक्षण क्षेत्रास उपयुक्त सॉफ्टवेअर आणि नव्या तंत्रज्ञानाचा विकास करण्यासाठी स्टार्टअप उभारणीवर भर देण्यात येणार आहे. भारतीय परिस्थितीस अनुरूप सॉफ्टवेअरचा विकास करून आपल्या अभ्यासक्रमांना आणि वर्गांना तंत्रज्ञानाच्या आधारे अधिक सक्षम करण्यात येणार आहे. शिक्षण-प्रशिक्षणाची महत्त्वाकांक्षी योजना तयार करण्यात आली असून बुद्धीमान आणि अष्टपैलू शिक्षकांना या क्षेत्राकडे आकर्षित करण्यासाठी नियुक्ती, पदोन्नती व प्रशिक्षण यावर लक्ष केंद्रीत करण्यात येईल. तसेच देशामधील ९५ विद्याप्रबोधीनींचा विस्तार करण्यात येईल व त्याआधारे शिक्षण क्षेत्रासाठी आवश्यक मनुष्यबळ तयार करण्यात येईल. सध्याचे बी.एड. अभ्यासक्रम बदलून चार वर्षांचा समग्र अभ्यासक्रम आखण्यात येईल आणि या अभ्यासक्रमाच्या प्रवेश, मूल्यांकन आणि अधिस्विकृतीची यंत्रणा अधिक सक्षम करण्यावर भर देण्यात येईल. शिक्षण क्षेत्रासाठी आवश्यक अशी प्रगत माहिती तंत्रज्ञानावर आधारलेली माहितीप्रधान उद्दिष्टे, कौशल्यप्रधान उद्दिष्टे आणि मूल्यप्रधान उद्दिष्टे साध्य करून प्रगत शैक्षणिक तंत्रज्ञान लोकाभिमुख करण्यावर भर देण्यात येईल. तसेच बदलत्या जगाशी स्पर्धा करताना आपल्या भाषिक क्षमतांचा विकास करण्यासाठी देशात भाषाशिक्षण व अनुवादकौशल्य विकसित करणाऱ्या संस्था उभारण्यात येतील. तसेच जगाच्या प्रगत देशांमधून नवा प्रवाह लक्षात घेऊन भारतामध्ये सुद्धा उदारकला (लिबर आर्टस्) च्या शिक्षणाची तरतूद करण्यात येईल. त्यासाठी शिखर संस्था स्थापन करण्यात येईल. तसेच भारतातील जैन, बौद्ध इ. दर्शनाचा अभ्यास करण्यासाठी राष्ट्रीय संस्था स्थापन करण्यात येतील. सध्याच्या शिक्षणातील कला, विज्ञान व वाणिज्य या विद्याशाखांतील फरक कमी करून आंतरविद्याशाखील व बहुविद्याशाखीय शिक्षणावर विशेष भर देण्यात येईल. त्यामुळे शिक्षण केवळ तात्त्विक न राहता ते जीवनोपयोगी व व्यावहारिक बनू शकेल. भारतीय संस्कृतीमधील श्रेष्ठ मूल्ये आणि व्यवहार या सुवर्णमध्य साधून त्यास विज्ञानतंत्रज्ञानाची जोड देण्याचे व शिक्षणाला अद्ययावत बनविण्याचे स्वप्न त्यामुळे साकार होईल.

अडचणी व उपाययोजना :

नवीन शैक्षणिक धोरण हे आदर्श व व्यवहार्य आहे. त्याच्या अंमलबजावणीसाठी सुसूत्र आणि सुसंगत अशी दमदार पावले टाकली पाहिजेत व एक कालबद्ध असा कृतीआराखडा तयार केला पाहिजे. या धोरणाच्या अंमलबजावणीस कर्नाटक सरकारने पहिल्यांदा पाऊल टाकले. त्यापाठोपाठ मध्यप्रदेश, उत्तरप्रदेश, आसाम, तेलंगणा या राज्यांनी आपली धोरणे व व्यूहरचना यांचा विकास आरंभला आहे. महाराष्ट्रातही त्यासाठी कार्यदल (टास्कफोर्स) विकसित करण्यात आले आहे. नवीन धोरणाच्या अंमलबजावणीमध्ये प्रमुख अडचणी पाहाता प्रादेशिक विविधता, यंत्रणांतील शैथिल्य, निधीची कमतरता व प्रगत तंत्रज्ञानाची उपलब्धता आणि वेग, अपुरी शिक्षक प्रशिक्षण यंत्रणा, पूरक पाठ्यपुस्तकांच्या निर्मितीसाठी लागणारा वेळ इ. अनेक समस्या आहेत. पण प्रबळ इच्छाशक्ती आणि निर्धार तसेच कल्पक नियोजन या आधारे हे धोरण आगामी पाच वर्षांमध्ये निश्चितपणे कृतीत येईल. अलिकडे या योजनेच्या अंमलबजावणीसंदर्भात पंतप्रधान श्री शाळा (पी.एम.श्री. शाळा) ही एक नमुनेदार योजना घेषित करण्यात आली आहे. त्यानुसार देशातील १४५०० शाळांचे आधुनिकीकरण करण्यात येणार आहे.

(क्रमशः)

# अक्कलकोट निवासी श्री स्वामी समर्थ महाराज

**ज्योतिर्मय साहित्य**

श्री गजानन महाराज शेगाव श्री ब्रह्मचैतन्य महाराज गोंदवलेकर गोंदवले श्री साईबाबा शिर्डी त्याचप्रमाणे स्वामी समर्थ महाराज अक्कलकोट हे सर्व ठिकाणे संतांच्या चरणस्पर्शाने पावन झालेले भूमी आहे. श्री स्वामी समर्थ ज्यांना आपण अक्कलकोट स्वामी म्हणतो महाराष्ट्रातील अक्कलकोट येथे खूप काळ म्हणजे जवळपास १४ वर्ष त्यांचे वास्तव्य वटवृक्षा खाली होते. श्रीपादवल्लभ व श्रीनृसिंहसरस्वती यांच्या नंतरचे भगवान श्रीदत्तात्रेयांचे ते तिसरे पूर्णा अवतार आहेत, अशी मान्यता आहे. गाणगापूरचे श्री नृसिंह सरस्वती हेच नंतर श्रीस्वामी समर्थांच्या रूपाने प्रकट झाले. ''मी नृसिंह भान असून श्रीशैलम्‌जवळील कर्दळी वनातून आलो आहे'' हे स्वामींच्या तोंडचे उद्गार ते नृसिंह सरस्वतींचा अवतार असल्याचे सुचवतात. विविध ठिकाणी स्वामी विविध नावांनी वावरले.

स्वामी समर्थांचा अवतार हा पंजाब प्रांतात हस्तीनापूर पासून जवळपास २५ ते ३० किलोमीटर अंतरावर असलेल्या छेली खेडी नावाच्या गावात वटवृक्षाच्या जवळ गणेश मूर्तीच्या शेजारी झाला . तिथे धरणी दुभंगून एक आठ वर्षाची अतिशय तेजस्वी बालमुर्ती प्रकटली. आणि तेच प्रत्यक्ष परब्रह्म श्री स्वामी समर्थ महाराज अशी ही आख्यायिका आहे. श्रीदत्तात्रयांचे तिसरे अवतार म्हणून अक्कलकोटचे श्रीस्वामी समर्थ मानले जातात. आपल्या अवतार समाप्तीच्या वेळी श्रीनृसिंहसरस्वती श्रीशैल्य येथून कर्दळीवनामध्ये गेले. तेथे ते तपश्चर्येला बसले. मध्ये साडेतीनशे वर्षे गेली. त्यांच्याभोवती वारूळ तयार झाले. एकेदिवशी एक लाकूडतोड्या लाकूड तोडताना त्याचा घाव चुकला आणि तो वारुळावर पडला. त्या वारुळातून श्रीस्वामी समर्थ प्रकट झाले, असे सांगितले जाते. लाकडे तोडताना कुऱ्हाडीचा घाव वारुळावर बसला व तो श्रीस्वामी समर्थांचे मांडीवर लागून श्रीस्वामी समर्थ समाधीतून जागे झाले. तो कुऱ्हाडीचा वार त्यांचे मांडीवर स्पष्ट दिसत असे. श्रीस्वामी समर्थ तेथून श्रीकाशीक्षेत्री प्रकट झाले. तेथून गंगाकाठाने कलकत्ता, जगन्नाथपुरी मार्गाने गोदावरी तीरावर आले. प्रथम श्रीस्वामी समर्थ मंगळवेढे ग्रामी प्रकट झाले. ते रानात वास्तव्य करीत. क्वचित गावात येत. गावात एक ब्राह्मण कुटुंब होते. ते श्रीस्वामी महाराज गावात आले की भोजन देत. मंगळवेढे येथील वास्तव्यानंतर श्रीस्वामी समर्थ पंढरपूर, मोहोळ, सोलापूर ह्या ठिकाणी वास्तव्य करून 'श्री' अक्कलकोट येथे आले . चैत्र शुद्ध द्वितीया शके १७७८ रोजी ते अक्कलकोट येथे प्रकट झाले. दिवस होता रविवार ६ – ४ – १८५६. त्या वेळी तीन दिवस स्वामींनी अन्नग्रहण केले नव्हते. चोळाप्पा यांनी स्वामींना आपल्या घरी नेले व त्यांना भोजन दिले. त्या वेळेपासून श्री चोळाप्पा स्वामींचे एकनिष्ठ शिष्य झाले. चोळाप्पांचे घरातील मंडळी त्यांना 'एक वेडा घरात आणून ठेवला आहे' असे म्हणत. श्री स्वामींच्या दिव्यत्वाची प्रचिती अक्कलकोट येथील मंडळीस येऊ लागली व लोक स्वामीदर्शनास येऊ लागले. महाराजांनी त्याचे आपल्या भक्तांना अनेक लीला दाखवल्या चमत्कार केले, तसेच उपदेशही केला.

श्री स्वामींची शिकवण म्हणजे त्यांनी वेळोवेळी प्रत्यक्षात कथन केलेल्या सांकेतिक शब्दातून व्यक्त केले आहेत. आत्मसाक्षात्कार करून घेण्यास साधकाला एखाद्या सद्गुरूस शरण जाण्याची गरज आहे. अशा सद्गुरूंची भेट झाल्यावर साधकाने सद्गुरूंच्या स्वरूपाचे निरंतर चिंतन करावे. त्यांची आराधना करावी. त्यांच्या मुखातून निघणारे प्रत्येक अक्षर, हे मंत्रस्वरूप मानून अंत:करणाने ग्रहण करावे. अशी गुरुसेवा केल्याने साक्षात्कार होऊन अंती मोक्षप्राप्ती होते. वाटेल त्याच्या हातचे अन्न ग्रहण करू नये. निरंतर केवळ विषय चिंतन करणाऱ्या स्त्री अगर पुरुषाच्या हातचा विडाही खाल तर तुम्हीही तसेच व्हाल. दुष्ट मनुष्याच्या हातचे अन्न खाल तर, तुम्हीही दुष्ट व्हाल. एक ईश्वरच सर्वत्र भरलेला आहे अशी भावना करा, जेणेकरून तुमचे मन निरंतर पवित्र राहील. परावलंबी नसावे, स्वत: उद्योग करावा व खावे. गांजा केव्हाही ओढू नये, त्याने अपाय होतो. आपल्या धर्माप्रमाणे वागावे व कर्तव्य करावे त्यानेच सर्वत्र विजय प्राप्त होतो. ज्याप्रमाणे बी पेरल्याशिवाय शेत आपण होऊन पीक देत नाही, त्याचप्रमाणे तुम्ही स्वत: कोणतीही ज्ञानपिपासा दाखविल्याशिवाय गुरू आपण होऊन ज्ञानोपदेश देणार नाहीत. साधना करताना ज्या काही सिध्दी प्राप्त होतात, त्यांचा चमत्कार दाखविण्याच्या कामी उपयोग करणे गैर आहे. परमार्थज्ञानाचा उपयोग स्वचरितार्थाचे साधन म्हणून करणे हे अयोग्य आहे.

ईश्वरीय ज्ञानाचा उपदेश करणाऱ्या सर्व धर्म मतांचे व सर्व पंथांचे अंतिम ध्येय एकच असल्यामुळे सर्व धर्म मते व पंथ वंदनीय आहेत. या जगात प्राप्त होणारी सुख–दु:खे, परमात्माच्या इच्छेने घडतात असे मानून त्यांचा स्वीकार करावा. मूर्तिपूजा ही त्याविषयी रहस्य जाणून करावी, केवळ मूर्तिपूजाच करीत राहणे, हेच मनुष्यप्राण्याचे कर्तव्य नाही. परमात्माप्राप्ती हे खरे ध्येय असल्याने उत्तरोत्तर आत्मोन्नती करून घेण्यासाठी प्रयत्नशील असावे.नामाच्या पाठीमागे मी आहे.


आज अक्कलकोट हे भाविकांचे फार मोठे श्रद्धास्थान आहे लाखो भक्त या ठिकाणी दर्शनाचा लाभ घेत असतात तेथे असलेल्या



दिलीप देशपांडे.
जामनेर. जि.जळगांव.
मोबा.८९९९५६६९१७

अन्नछत्रात प्रसादाचाही लाभ घेतात अक्कलकोट येथे.......

श्री गुरु मंदिर म्हणजेच बाळाप्पा महाराजांचा मठ. धारवाड जिल्ह्यातील श्रीमंत सराफ बाळप्पा. आपल्या संसाराचा त्याग करून तिसावे वर्षी अक्कलकोटला गुरु शोधार्थ आले. स्वामींनी त्यांना अनुग्रह देऊन आपल्या आत्मलिंग पादुका दिल्या आणि मठ बांधण्याची आज्ञा केली. माझ्या आत्मलिंग पादुका घेऊन त्यावर एखादा उत्तम मठ स्थापन कर आणि वार्षिक उत्सव करत जा असे त्यांना सांगितले त्यानुसार बाळाप्पांनी मठ स्थापन केला तोच बाळप्पा चा मठ म्हणून ओळखला जातो.




अक्कलकोट येथे वटवृक्ष संस्थान मठ आहे . त्याच परिसरात स्वामी समर्थांचे मंदिरे आहे भक्तांचा या ठिकाणी फार मोठ्या प्रमाणावर ओढा आहे या वटवृक्ष खाली स्वामिनी जवळपास १४ वर्षे वर्ष रहिवास होता आजही तेथे येणाऱ्या भाविकास पूजा नैवेद्य अभिषेक तसेच राहण्याची भोजनाची व्यवस्था केली जाते तसेच संस्थानमार्फत प्रवासासाठी खुले आहे या मठात श्रीच्या जागृत पादुका असून गुरुपौर्णिमा दत्त जयंती स्वामी पुण्यतिथी आदी उत्सव संपन्न होतात.

स्वामींनी यांच्या घरी बरीच वर्षे वास्तव्य केले त्या भक्त चोळपाच्या इच्छेनुसार श्रींची समाधी या मठात आहे चोळप्पाच्या घराजवळ समाधी मंदिर असून त्यात स्वामींनी दिलेल्या पादुका आहेत.

जोशीबाचा मठ, शंकरराव राजेरायन यांचा मठ, महाराजांच्या चर्मपादूका, हाक्याचा मारुती, जंगम यांचे शिव मंदिर, मुरलीधर मंदिर, दर्गा, मालवणी मालोजीरांचा किल्ला, शिवपुरी, आदी ठिकाणे भेट देण्यासारखे आहेत.


सूर्योदय आणि सूर्यास्ताच्या वेळी अग्निहोत्र कसे करावे? अग्निहोत्र म्हणजे काय इत्यादी महत्त्वाची माहिती शिवपुरी येथे सांगतात त्यासाठी सूर्यास्ताच्या आधी साधारणपणे एक तास पोहोचावे लागते तसेच श्री महारुद्र रावांची समाधी चोळप्पा महाराज वाड्यातील श्री महाराजांच्या समाधी मठासमोर आहे. याच महारुद्रवांना वचन दिल्याप्रमाणे केज येथे त्यांच्या घरी जाऊन सगुण दर्शन दिले आणि म्हणूनच हम गया नही जिंदा है या वचनाची साक्ष पटते . आजही त्यांच्या मार्फत मठात सेवा सुरू आहे. आज महाराष्ट्रात बहुतेक जिल्हा तालुक्याच्या ठिकाणी तसेच अगदी ग्रामीण भागातही स्वामी समर्थांची मंदिरे तसेच पुणे,नासिक, जळगाव ,मुंबई आदी ठिकाणी स्वामी समर्थांचे मठ आहेत आणि त्या ठिकाणी दररोज उपासना सुरू असते. श्री स्वामी समर्थ जय जय स्वामी समर्थ हा जप सुरू असतो.स्वामी समर्थांच्या पोथीचे वाचन, पारायण सुरु असते. आता अक्कलकोट ला मंदिराच्या व्यवस्थेत खूप सुधारणा झालेली आहे.बदल झाला आहे. भाविकांचा ओघही वाढलेला आहे. शनिवार दिनांक २६ एप्रिल २०२५ हा स्वामी समर्थांचा समाधी दिन आहे स्वामी समर्थांच्या चरणी कोटी प्रणाम.

।। श्री स्वामी समर्थ.।।

# मुंबई गॅलरी व आयएएस ऑफिसर निधी चौधरी

**ज्योतिर्मय साहित्य**

छत्रपती शिवाजी महाराज वस्तुसंग्रहालय मुंबई हे मुंबईचे सांस्कृतिक वैभव असलेले ठिकाण. या संग्रहालयाच्या विविध उपक्रमांना जी मरगळ आली होती ती या संस्थेच्या संचालिका म्हणून आयएएस ऑफिसर निधी चौधरी यांची नेमणूक झाली आणि या संग्रहालयाचे महत्व पुन्हा भारतभर पसरले. या संग्रहालयातील विशेष आकर्षण म्हणजे मुंबई गॅलरी. 'मुंबई गॅलरी जी मुंबई शहराच्या सामाजिक, सांस्कृतिक आणि शहरी विकासाचा गागोवा घेते. या गॅलरीत निधी चौधरी यांनी विशेष उपक्रम अंतर्गत मुंबईच्या संस्कृतीचा विशेषत: महिलांच्या दृष्टीकोनातून वारशाचा अभ्यास, दस्तऐवजीकरण आणि प्रदर्शन यांचे कार्यक्रम केले. या संग्रहालयातील विविध वस्तुंचे नुसते जतन करणे नाही, तर त्या मागच्या कथा जगापर्यंत पोहोचवणे हा आहे. यामध्ये लोककला, शहरविकास, महिला कलाकारांच योगदान आणि मुंबईच्या सांस्कृतिक ओळखीवर प्रकाश टाकणार्या कलाकृतींच संकलन करण्यात आलं. या उपक्रमात कार्यरत असलेल्या महिला अभ्यासकांनी प्रदर्शनातील निवडक घटक न्यूयॉर्कमधील 'न्यूयॉर्क हिस्टॉरिकल सोसायटी म्युझियम' आणि लायब्ररी मध्येही सादर केले. यामागचा उद्देश स्पष्ट होता तो म्हणजे, मुंबईच्या लोकवारशाला जागतिक व्यासपीठ मिळवून देणे. त्यांनी मुंबईतील छोट्या छोट्या कहाण्या, स्त्रियांच योगदान, उपेक्षित कलाशैली यांना आंतरराष्ट्रीय दृष्टिकोनातून मांडत जगासमोर मुंबईच्या आत्म्याची ओळख करून दिली. संचालिका निधी चौधरी यांनी छत्रपती शिवाजी महाराज वस्तू संग्रहालय हे एक संग्रहालय नसून संशोधन, शैक्षणिक उपक्रम आणि सांस्कृतिक संवादाचे केंद्र आहे हे समाजाच्या मनावर ठसविले. त्यांनी विद्यार्थ्यांसाठी कार्यशाळा, अभ्यास दौरे, हेरिटेज वॉक्स आणि वेगवेगळ्या विषयांवर आधारित प्रदर्शन सतत आयोजित करून नव्या पिढीला आपल्या वारशाची ओळख करून दिली. संख्यात्मक दृष्ट्या संग्रहालयात कलाप्रेमींचे येण्याचे प्रमाण कमी झाले आहे,अशा वेळी गेल्या सहा महिन्यात निधी चौधरी यांनी काही प्रदर्शने व मोजके कार्यक्रम होत होते ते वाढविण्याचे प्रयत्न केले. विशेषतः त्यांनी जव्हार, डहाणू, मुंबई महापालिका शाळांचे विद्यार्थी, मुंबई विद्यापीठ, एसएनडीटी विद्यापीठ येथील विद्यार्थ्यांना या उपक्रमामध्ये सहभागी करून घेतले. हे वस्तुसंग्रहालय मुंबईचे सांस्कृतिक मन आहे. या



वस्तू संग्रहालयात साहित्यिक महोत्सव, सांगितीक कार्यक्रम, नृत्याविष्काराचे आयोजन असे प्रयोगशील उपक्रम आयोजित करण्यास सुरवात केली. ज्यामुळे युवापिढी या संस्थेशी जोडली जाऊ लागली आहे. या विविध उपक्रमांमुळे युवा पिढीला आणि त्यांच्या मनाला नवी दिशा, नवा आवाज लाभतो आहे. आज जेव्हा जगभर डिजिटल क्रांतीच्या युगात वारसा हरवत चाललाय, तेव्हा या संग्रहालयाने घेतलेला पुढाकार मुंबईच्या ओळखीला अधिक सशक्त स्वरूप देत आहे.

एखादा अधिकारी जेंव्हा संवेदनशील मनाने एखाद्या संस्थेत अमुलाग्र बदल घडविण्याचे ध्येय मनात घेतो, तेव्हा तो बदल कसा घडतो याचे मूर्तीमंत उदाहरण म्हणजे छत्रपती शिवाजी महाराज वस्तू संग्रहालयाच्या संचालिका निधी चौधरी. यापूर्वी त्यांनी केलेले काम हे प्रशासकीय स्वरूपाचे होते, स्वतः कवयित्री असणाऱ्या, चित्र काढण्यामध्ये पारंगत असणाऱ्या निधी चौधरी यांना या वस्तू संग्रहालयाची जबाबदारी आल्यावर त्यांनी गतवैभव प्राप्त या वस्तूसंग्रहालयाला करून देण्यास सुरुवात केली आहे. ध्येय मनात ठेऊन लेखक, कवी, चित्रकार, कलाकारांना संधी देत त्यांना जागतिक पातळीपर्यंत नेण्याची दूरदृष्टी त्यांनी अमलात आणण्यास सुरुवात केली. या संग्रहालयात १६०० चित्रांचा संग्रह आहे. हा चित्रांचा संग्रह भारताच्या विविध भागांमध्ये फिरती प्रदर्शने आयोजित करीत ही चित्रे लोकांपर्यंत पोहचविण्याचे ध्येय त्यांनी मनात आणले. भुवनेश्वर येथे अशा प्रकारचे प्रदर्शन त्यांनी आयोजित केले. महाराष्ट्राच्या विविध शहरी भागात तसेच ग्रामीण भागात हे प्रदर्शन जाऊ शकेल यासाठी त्यांचे नियोजन चालू आहे. साता–यातही हे प्रदर्शन येण्यासाठी साताऱ्याच्या शिवाजी संग्रहालयाने प्रयत्न करायला हवेत. सातारा शहरात आणि जिल्ह्यात युवा चित्रकार पिढी वाढते त्यांनाही या चित्र प्रदर्शनाचा फायदा होऊ शकतो.



शिरीष चिटणीस

छत्रपती शिवाजी महाराज वस्तुसंग्रहालय मध्ये प्राचीन इतिहास, कलाकृती, लोकजीवन, परंपरा आणि जागतिक वारसा यांचा समृद्ध संगम पहायला मिळतो. पूर्वी प्रिन्स ऑफ वेल्स म्युझियम म्हणून ओळखलं जाणार हे संग्रहालय १९०५ साली प्रिन्स जॉर्ज यांच्या भारत भेटीनंतर उभारण्यात आलं आणि १९२२ साली सर्वसामान्यांसाठी खुले करण्यात आलं. हे संग्रहालय फोर्ट भागात गेटवे ऑफ इंडियाच्या जवळ वसलेलं असून भारतातील सर्वोत्तम संग्रहालयापैकी एक मानलं जातं. संग्रहालयाची भव्य इमारत इंडो–सारसेनिक शैलीत बांधलेली असून त्यात इस्लामी, हिंदू आणि युरोपी स्थापत्यशैलीचा सुंदर संगम दिसतो. या संग्रहालयाच्या आंतरराष्ट्रीय दर्जाच्या दालनामध्ये ऐतिहासिक वस्तू,प्राचीन शिल्पकला, चित्रकला, तांबे पितळीच्या मूर्ती, हस्तलिखिते, धातूची नाणी आणि परदेशी वस्तूंचा मोठा संग्रह आहे.

विशेषतः संग्रहालयाच्या संचालिका निधी चौधरी, ज्यांनी मिळालेल्या संधीचा योग्य उपयोग करून घेत स्वतःच्या कलात्मक आवडीचा वापर संग्रहालयाचा असणारा जागतिक ब्रँड विकसित करण्यासाठी केला. त्यांचा शिक्षणासाठीचा संघर्ष आपल्याला प्रेरणा देऊन जातो. त्यांच्या आईच्या भक्कम पाठबळावर आणि आधारावर उभा राहिलेला त्यांचा संघर्षमय प्रवास दिशादर्शक आहे. छत्रपती शिवाजी महाराज वस्तुसंग्रहालयात कार्यरत असलेल्या या महिलेचा प्रवास हा केवळ शिस्तबद्ध अभ्यासाचा नाही तर, संघर्ष–जिद्द आणि आईच्या निस्सीम पाठिंब्याचा आहे. आज त्या एक मान्यवर क्युरेटर आहेत. परंतु इथवरचा प्रवास अतिशय खडतर होता.त्या एका अशा पार्श्वभूमीत वाढल्या जिथे मुलींना शिक्षण देण्याकडे दुर्लक्ष होत असे. त्यांचं लहानपण आर्थिकदृष्ट्या मर्यादित आणि सामाजिक दृष्टिकोनाने दबावाखाली गेलं. शिक्षणासाठी त्यांनी अनेक अडचणी झेलल्या. शाळा दूर होती, साधनसामग्री नव्हती, आणि घरात अभ्यासासाठी वातावरणही नव्हतं.पण त्यांना वाचनाची आवड आणि शिकण्याची ओढ लहानपणापासूनच होती. त्यांच्या आयुष्यात एक व्यक्ती ठामपणे उभी होती त्यांची आई. समाजाने विरोध केला, नातेवाईकांनी ताशेरे ओढले, पण त्यांच्या आईने 'मुलीला शिकवायचंच' असा निर्धार केला. ती रोज त्यांच्या मुलांना शाळेत पाठवत असे, त्यासाठी घरकाम करून पैसे जमवत असे. शिक्षणात कधी खंड पडू नये म्हणून आईने अनेकदा स्वतःच्या गरजा बाजूला ठेवल्या. निधी चौधरी आजही नम्रपणे सांगते, ''माझ्या आईच्या पाठबळामुळे मी शिकले. समाज थांबवू शकला असता, पण माझी आई कधीच थांबली नाही.''

शिक्षणात खंड पडत असतानाही त्यांनी स्वअभ्यास केला, वाचनालयं शोधली, शिष्यवृत्तीसाठी अर्ज केले.त्यातून त्यांनी इतिहास आणि संस्कृतीवर आधारित अभ्यास सुरू ठेवला. कालांतराने त्यांना – छत्रपतीं शिवाजी महाराज वस्तू संग्रहालया मध्ये काम करण्याची संधी मिळाली.आणि तेथून त्यांनी आपल्या ज्ञानाचा आणि संवेदनशीलतेचा वापर करून '' सारखा उपक्रम घडवला. त्यांचा जीवनप्रवास म्हणजे एक स्त्री शिक्षणाच्या आणि संस्कृतीच्या मार्गाने आपला जीवनप्रवास कसा उंचावते याचा उत्कृष्ट नमुना. आज त्या ज्या ठिकाणी आहेत, तिथं पोहोचण्यासाठी त्यांना समाजाच्या बंधनांशी झगडावं लागलं. पण आईच्या नशिबी आलेली ही मुलगी अखेर मुंबईच्या सांस्कृतिक आवाजाची शिल्पकार झाली.



## आयुष्याला नव्याने सामोरे जाण्याची प्रेरणा देणारा 'आता थांबायचं नाय' १ मे ला येणार प्रेक्षकांच्या भेटीला

**ज्योतिर्मय साहित्य**

झी स्टुडिओज्‌ नेहमीच प्रेक्षकांना , मनोरंजक, दर्जेदार आशय असलेले चित्रपट देत आले आहेत. झी स्टुडिओज्, चॉक अँड चीज फिल्म्स आणि फिल्म जॅझ मिळून आपल्यासाठी असाच एक सकारात्मक दृष्टिकोन देणारा चित्रपट आपल्या प्रेक्षकांसाठी घेऊन येत आहेत . सहकुटुंब हसत खेळत प्रत्येकाला अंतर्मुख करायला लावणारा 'आता थांबायचं नाय' हा चित्रपट येत्या महाराष्ट्रदिनी म्हणजेच १ मे रोजी प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे.

परीक्षा म्हंटल की पोटात गोळा येतो पण या चित्रपटातील परीक्षेचे किस्से तुम्हाला कधी हसवतील, तर कधी रडवतील आणि जाताना नक्कीच काहीतरी देऊन जातील. या चित्रपटातील 'भोलानाथ'चे लहान मुलांचे मोठ्यांसाठी असलेले गाणे या चित्रपटाबद्दलची उत्सुकता अधिकच वाढवणारे आहे. यावर्षी लहानांच्या सुट्टीत मोठ्यांची शाळा आपल्याला या चित्रपटाच्या निमित्ताने पाहायला मिळणार हे नक्की !

आपल्या दैनंदिन जीवनाच्या अडचणीतून वाट काढत आपल्या स्वप्नपूर्तीसाठी , यशासाठी झेप घेताना तुमच्या–आमच्या सारख्या एका सामान्य माणसाला कोणत्या गोष्टींना सामोरे जावे लागते आणि हा प्रवास यशस्वी होतो का हे पाहाण्यासाठी आपल्याला येत्या १ मे रोजी रुपेरी पडद्याला भेट द्यावी लागेल, कारण प्रत्येक मराठी कुटुंबाने बघायला हवा असा हा चित्रपट आहे.

या चित्रपटातील 'आता थांबायचं नाय' हे गाणे प्रदर्शित झाले असून जीवनाच्या नवीन प्रवासाचा, उंच भरारी घेण्याचा, नवे स्वप्न पाहण्याचा आणि ते पूर्ण करण्यासाठी घेतलेला ध्यासाचा आनंद व्यक्त करणारे हे गाणे आहे. या गाण्याला अजय गोगावले आणि आनंदी जोशी हिने आपल्या सुरांनी साज चढवला आहे. तर संगीतकार गुलराज सिंग यांनी सर्व गाणी संगीतबद्ध केली असून मनोज यादव गीतकार आहेत.

या चित्रपटात उत्तम कलाकारांची फौज पाहायला मिळणार असून आता थांबायचं नाय या चित्रपटाच्या निमित्ताने सुप्रसिद्ध अभिनेते भरत जाधव चार वर्षांनंतर पुन्हा एकदा मोठ्या पडद्यावर झळकणार आहेत. या चित्रपटात भरत जाधव यांच्यासह आशुतोष गोवारीकर, सिद्धार्थ जाधव, प्राजक्ता हनमघर, किरण खोजे, प्रवीणकुमार डाळिंबकर, ओम भुतकर, पर्ण पेठे, श्रीकांत यादव आणि रोहिणी हट्टंगडी यांच्याही महत्वपूर्ण भूमिका आहेत. आता थांबायचं नायच्या निमित्ताने शिवराज वायचळ याने चित्रपट दिग्दर्शनात पदार्पण केले आहे.

दिग्दर्शक शिवराज वायचळ म्हणतो, '' आता थांबायचं नाय हा चित्रपट सत्यघटनेवर आधारित असून आयुष्यातील संघर्ष व पुढील वाटचालीसाठी एक प्रेरणादायी संदेश या चित्रपटातून प्रेक्षकांना मिळेल. वेगवेगळ्या धाटणीचे चित्रपट देणाऱ्या झी स्टुडिओजसोबत काम करण्याचा अनुभव अतिशय समृद्ध करणारा आहे. हा माझा पहिलाच चित्रपट. त्यातही अशी टीम लाभल्याने नक्कीच याचे फळ चांगले असेल, अशी आशा आहे.

***

हे जरनल संपादक व प्रकाशक संजय व्यापारी यांनी १०१, सी विंग, सिल्व्हर स्पेस सोसायटी, विशाल नगर, पिंपळे निलख, पुणे–४११००१ (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.
या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयाच्या कक्षेत) E-mail-jyotirmaysahitya@gmail.com, Mob. 7743918559